# मेहनत आणि चिकाटीच्या गुंतवणूकीतून कडकनाथ पक्षीपालन देतेय भरघोस आर्थिक उत्पन्न



| | | |
|---|---|---|
| नांव | - | अविनाश भालचंद्र कुरेकार |
| राहणार | - | वरोरा जि. चंद्रपूर |
| हल्ली मुक्काम | - | नांदुरा ता. बाभुळगांव जि. यवतमाळ |
| जन्मतारीख | - | २३ जुन १९७४ |
| शिक्षण | - | १२ वी |
| भ्रमणध्वनी क्र. | - | ७७१९०६१६१६/९९२१८८२३२७ |

माझे वडील शासकीय नोकरीत होते आणि त्यांची प्रबळ इच्छा होती की मी सुद्धा शिक्षण घेवून शासकीय नोकरी करावी. शेती आणि पशुपालनापासून ग्रामिण युवक दुरावत चाललेला दिसतोय. हवामानातील बदल, मजुरांची वाणवा, विपणन अडचणी, आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जागृतीचा अभाव, अशा एक ना अनेक समस्यांचा शेतकरी सामना करतोय. आणि अशा परिस्थितीत साहजिकच माझ्या वडिलांचा सल्ला रास्तच होता. परंतु, आधीपासूनच माझा कल शेतीकडे सकारात्मक असाच होता. त्यामुळे शेतीसोडून दुसरा व्यवसाय करणे वा नोकरीची प्रतिक्षा करणे या बाबत वेळ न दवडता तडकाफडकी १२ वी नंतर शेतीव्यवसाय सुरू केला. काही वडीलोपार्जित आणि स्वतः शेती व्यवसायावरच खरेदी केलेली अशी एकुण ८ एकर शेती माझेकडे होती. आधुनिक पद्धतीने शेती आणि सोबत पुरक व्यवसाय केला तरच शेती फायदेशीर ठरू शकते याबाबत माझा विश्वास शेतीअनुभवातून अधिक दृढ झाला.

शेतीसोबत पुरक व्यवसाय काय करावा ही मनाची घालमेल सुरू असतांनाच आजुबाजुच्या परिसरात आणि शहरीभागात गावरान आणि कडकनाथ पक्षाला भरपूर मागणी आहे असे आढळले. आरोग्याबाबत अधिक सजग असलेले शहरी नागरीक कडकनाथ कोंबडयाच्या मांसामध्ये असलेल्या उपयुक्तपोषक मुल्यामुळे अधिक रूची दाखवितात असे अभ्यासाअंती दिसून आले. ही बाजार मागणी लक्षात घेवून कडकनाथ आणि गावरान पक्षी पालन करण्याचे मनोमन निश्चीत केले. त्याबाबत शक्य त्यामार्गाने शास्त्रीय माहिती गोळा करणे सुरू केले. योगायोगाने याच काळात लातूर जिल्हयातील उदगीर येथील पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक डॉ.नरेन्द्र खोडे आणि भद्रावती येथील डॉ. व्हि.एस.कामडी यांच्यासोबत संपर्क झाला. आणि त्यांच्या मार्गदर्शनात २०१५ मध्ये कडकनाथ पक्ष्यांची २०० पिल्ले आणून व्यवसायास सुरूवात केली. शेडचे बांधकाम व इतर सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी बँकेचे कर्ज घेतले. डॉ नरेन्द्र खोडे आणि डॉ.व्हि.एस.कामडी यांनी अविरतपणे

कुक्कुटपालनाविषयी आलेल्या अडचणी बाबत मार्गदर्शन केले आणि हवीती शास्त्रीय माहीती पुरविली.

शेतात वीज जोडणी नव्हती त्याबाबत बराच पाठपुरावा करावा लागला. फार्म गावापासून दुर असल्याकारणाने मजुर मिळणे आणि विश्वासपात्र असणे ही सुद्धा अडचण होतीच. आणि अशा ब-याच अडचणींना सुरूवातीस तोंड द्यावे लागले. सुरूवातीस पुण्यातून कडकनाथ पक्ष्यांची २०० पिल्ले आणून फार्म सुरू केला. खाद्य, अंतर्गत तापमान, स्वच्छता, आरोग्य, जैवसुरक्षा आदीबाबत मार्गदर्शकांच्या सल्ल्याने शास्त्रीय पद्धतीचा अंगिकार केला. माझा धाकटा भाऊ अभिषेक कुरेकार फार्मचे व्यवस्थापन २ मजुराच्या मदतीने करतो आणि मी विपणन व्यवस्थापनावर लक्ष केंद्रीत केले आहे. त्याकरीता यवतमाळ आणि लगतच्या कळंब येथील चिकन सेंटर व्यावसायिकासोबत संपर्क स्थापित केला आणि आजुबाजुच्या खेडयात कडकनाथ पक्षांच्या मांसातील औषधीय गुणधर्माबाबत जनजागरण केले. सुरूवातीस बहुतांश कोंबडया आजुबाजुंच्या ग्रामिण भागातील ग्राहक किरकोळ पद्धतीने फार्म वरून थेट खरेदी करीत असे. आजमितीस माझेकडे कडकनाथ कोंबडया १५००, गावरान कोंबडया ५०० आणि ५ टर्की पक्षी आहेत.

शहरातील चिकन सेंटरचे व्यावसायिक घाऊक पद्धतीने फार्मवरून पक्षी खरेदी करतात व काही पक्षी आजुबाजुच्या गावात किरकोळ विक्रीद्वारे विकल्या जातात. चार महिन्यात पक्षीविक्री योग्य होतात. दर चार महिन्याला १५०० कडकनाथ पक्ष्यांपासून (सरासरी वजन १.२किग्रॅ) प्रति किलोग्रॅम रू.४०० या दराने सात लाख रूपये उत्पन्न मिळते. अडीचशे रूपये नगाप्रमाणे गावरान ५०० कोंबडयांचे १ लाख २५ हजार रूपये आणि टर्की पक्ष्यापासून सरासरी ४००० रूपये उत्पन्न प्राप्त होते. पिल्ले खरेदी ९५ हजार रूपये, खाद्य १ लाख ८० हजार रूपये, २० हजार रूपये औषधी आणि उपचार, मजुरी ६४ हजार रूपये, २० हजार रूपये विद्युत बील, शेडचे रिपेअरींग व मेंटेनन्स ६००० रूपये, जवळपास ६० हजार रूपये किमतीच्या पक्ष्यांची मरतुक आणि कर्जापोटी मुद्दल आणि व्याज मिळून ५७ हजार रूपये असा चार महिन्याचा एकंदरीत ५ लाख खर्च वजा केला असता दर चार महिन्याला सरासरी ३ लाख रूपये निव्वळ नफा होतो. सद्या मी १००० क्षमतेचे अंडी उबवणुकीचे सयंत्र हैदराबाद येथून खरेदी केले असून त्यामुळे भविष्यात पिल्ले खरेदी करावी लागणार नाही. शेतीत भाजीपाला, तुर, कापूस आदी पिके घेत आहे. कुक्कुटपालनातून मिळणा-या खताचा वापर शेतीत केल्यामुळे शेती उत्पन्नात वाढ झालेली आहे.

भविष्यकाळात पिल्ले, अंडी व खाद्य विक्री बरोबर मुल्यवर्धीत उपपदार्थांची विक्री करून त्यायोगे व्यवसाय अधिक वृद्धिंगत करणे असा मानस आहे. मेहनत आणि चिकाटीसोबत शास्त्रशुद्ध तंत्राचा

अवलंब आणि योग्य नियोजन, हेच माझ्या यशाचे गमक आहे असे मला वाटते. तरूण युवकांनी शेती आणि त्यास पुरक असलेल्या पशुपालन वा इतर जोडधंदयाबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, शासकीय मदतीवर फार विसंबून राहु नये आणि मेहनतीला पर्याय नाही हे कदापी विसरू नये.

मार्गदर्शक: डॉ नरेन्द्र खोडे, सहायक प्राध्यापक, पवैम, उदगीर आणि डॉ. व्हि.एस.कामडी, भद्रावती



अर्जुन हेन फार्म



कडकनाथ पक्षी



टर्की पक्षी



गावरान कोंबडया